Council of Education's
DESHBHAKTA RATNAPPA KUMBHAR COLLEGE OF COMMERCE,KOLHAPUR
(AN AUTONOMOUS COLLEGE)
Address- 649, C ward, RaviwarPeth, Azad Chowk, Kolhapur – 416 002.
Reaccredited with "A" Grade by NAAC

Principal
Captain Dr. R. S. Naik
M. A., SET., M. Phil., Ph.D.

Phone: 0231-2641224
Email: info@drkcollegekolhapur.org
Website: www.drkcollegekolhapur.org

# National Service Scheme

## Participation in AIDS Awareness Rally on the occasion of World AIDS Day: 03/12/2024






Principal
Captain Dr. R. S. Naik
M. A., SET., M. Phil., Ph.D.

Phone: 0231-2641224
Email: info@drkcollegekolhapur.org
Website: www.drkcollegekolhapur.org


# National Service Scheme






## एचआयव्हीमुक्त जिल्हा म्हणून ओळख होईल

### संजय शिंदे यांचा विश्वास : जागतिक एड्स निर्मूलन दिनी कोल्हापुरात रॅली

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : देशभरात १९८६ पासून एड्स निर्मूलनासाठी काम सुरू असून, आता जिल्ह्यात एड्स नियंत्रणात यश मिळत आहे. २०३० पर्यंत एचआयव्ही-मुक्त जिल्हा म्हणून कोल्हापूरची नवी ओळख निर्माण होईल, असा विश्वास प्रभारी जिल्हाधिकारी संजय शिंदे यांनी व्यक्त केला.

छत्रपती प्रमिलाराजे जिल्हा रुग्णालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रभात फेरीस शिंदे, प्रमुख पाहुणे अभिनेते सागर तळाशीकर, आरोग्य उपसंचालक डॉ. दिलीप माने, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुप्रिया देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे, राष्ट्रीय एड्स नियंत्रण जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपा शिपूरकर यांनी हिरवा झेंडा दाखवला.

सागर तळाशीकर, डॉ. दिलीप माने, डॉ. सुप्रिया देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. शिपूरकर म्हणाल्या, 'टेक दी राइट पाथ' ही या एड्स दिनाची थीम असून, एचआयव्हीग्रस्तांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास बळ देणे गरजेचे आहे. जिल्हा पर्यवेक्षक निरंजन देशपांडे यांनी एड्समुक्तीची शपथ दिली. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. हर्षला वेदक, डॉ. सरिता थोरात उपस्थित होत्या. विनायक देसाई यांनी सूत्रसंचालन केले. मकरंद चौधरी यांनी आभार मानले. डी. वाय. पाटील नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. समग्र प्रकल्प कोल्हापूर यांनी तयार केलेल्या एचआयव्ही जागृती पोस्टरचे उद्घाटन झाले. फाइव्ह स्टार मानांकन मिळविलेल्या आयसीटीसी ग्रामीण रुग्णालय मलकापूर, पंचगंगा हॉस्पिटल कोल्हापूर येथील क्रांतिसिंह चव्हाण, चंद्रकांत गायकवाड, सुरेखा जाधव, मीनल पाटील यांचा, तर एचआयव्ही संसर्गित रुग्णांसाठी काम करत असलेल्या मालन नौकुडकर, अनिता जाधव, सुरेखा सूर्यवंशी या स्वयंसेवी संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा सन्मान केला.

जागतिक एड्स दिनानिमित्त आयोजित रॅलीवेळी संजय शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. अनिरुद्ध पिंपळे, सागर तळाशीकर, डॉ. दिलीप माने, डॉ. सुप्रिया देशमुख, डॉ. हर्षला वेदक, डॉ. सरिता थोरात, दीपा शिपूरकर उपस्थित होत्या.

लोकमत 4/12/24